# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०८/१७
## दि.१८/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ४६७/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | टी.एम.गवारी,पो.हवा.निगडी,पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | शंकर किसन झेंडे,वय ३९ वर्षे,रा.बापुजी बुवा मंदिर हॉरीजन बील्स अपार्टमेंट प्लॉट नं.०७, तिसरा मजला, प्राधिकरण,निगडी,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/२०१७ रोजी १३/५० वा.चे सुमारास पुणे मुंबई रोडवरील सौभाग्य मार्बल ॲन्ड ग्रेनाइट दुकानाचे समोरील उड्डान पुलावरती,निगडी,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी स्वतः उड्डाणपुलाचे सिमेटच्या संरक्षण भिंतीला जोरात धडकुन गंभीर जखमी होवुन स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जी.बी.खारगे |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४४७/१७,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६७ वर्षे,रा.बाणेर रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १८/०८/२०१७ रोजी २०/१५ ते २०/३० वा.चे दरम्यान ग्रिनपार्क हॉटेलचे गेटजवळ असणा-या कट्टयावर बाणेर रोड, पुणे व पारिजात कॉलनी सुस रोड, पाषाण, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया कट्यावर मोकळ्या हवेत बसले असता,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र, एक छोटे गंठण असा एकुण ६५ हजार रु.किंमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. दयानंद ढोम ९८२३८५५४६६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ३७०/१७,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | निलम उपरवट,वय ४२ वर्षे,रा.भोसरी, पुणे. |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/२०१७ रोजी दुपारी १३/२० वा.चे सुमारास यशोदा हॉटेलचे मागे सदगुरुनगर, भोसरी येथे पत्र्याचे कंपाऊंड असलेल्या मोकळया जागेत,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी यांचे राहते ठिकाणी १)टाटा कंपनीचा ४०७ टेम्पो यामधील डायनाटेक व पिंटो कंपनीचे दोन साऊंड सिस्टम, २)टाटा कंपनीचा ४०७ टेम्पो, ३) इर्टिगा गाडी असे पार्क केल्या असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने एकुण १२ लाख रु.किंमतीच्या गाडयांना आग लावुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पी. आर. कठोरे ९५२७३५६३४० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २११/१७,भादविक ४२०,३४, आय.टी. ॲक्ट क. ६६(ड) |
| **फिर्यादी** | देवेंद्र परमार, वय ३७ वर्षे,रा.शिवाजीनगर पुणे |
| **आरोपी** | १)अनिता अरविंद कुमार चौहाण,वय २९ वर्षे,रा.बाळकृष्ण ए ब्लॉक सहाड पाठक उल्हास ठाणे २)दिपक मनोज सिंग,वय ३० वर्षे,रा.आर्नेस्ट इन्क्वेस्ट बी विग २०४ नालासोपारा (अटक) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०६/२०१७ रोजी ते आज पर्यंत गल्ली नं.०९ पाटील इस्टेट शिवाजीनगर पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील अनोळखी इसम व महिला यांनी फिर्यादी यांना बजाज फायनान्स कंपणीच्या नावाने कर्ज देण्याच्या बहाण्याने आरती सक्सेना, रीचा शर्मा, कबीर खान, प्रिन्स या नावाने फोन करून कर्ज देण्याच्या बहाण्याने वेगवेगळे कारणे सांगुण वेळोवेळी वेगवेगळया अकाऊंटवर एकूण ३ लाख ६० हजार रू. भरण्यास भाग पाडुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) लकडे ८६२४०८९२३४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८१६ /१७,भादविक ४२०,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | रतन गंगाधर,वय ४८ वर्षे रा. तारवाडी, फुरसुंगी, ता.हवेली,जि पुणे |
| **आरोपी** | सतिश जैन, रा.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. १४/०६/२०१७ रोजी ते दि.२३/०६/२०१७ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची क्विकर ॲपवरील त्याची कम्प्युटर विक्रीबाबतची जाहिरात बघुन इसम नामे-सतिश जैन याने त्याचे मोबाई नं.९५१८९७४५८३ वरुन फिर्यादीशी संपर्क करुन,त्याला सदरचा कम्प्युटर ६८ हजार रु.ला खरेदी करण्यास इच्छुक असुन, चेकने पैसे देणार असलेबाबत सांगितले त्याप्रमाणे दि.१५/०६/२०१७ रोजी त्याने फिर्यादी यांना कोरेगाव पार्क येथे भेटला व त्यांच्याकडुन कम्प्युटर घेवुन गेला, व त्यांना आय.सी.आय.सी.आय. बँक बी.टी कवडे रोड शाखा या बँकेचा ६८ हजार रु.चा चेक हा दि.१९/०६/२०१७ रोजीच दिला. त्यानंतर फिर्यादीने सदरचा चेक बँकेत भरला असता त्यावरील सही खातेधारकाची सहिशी जुळत नसल्याने तो त्यांना परत करण्यात आला तसेच सदरचे चेक देणार अकाऊंट धारकाचे नाव सतिश जैन नसुन दुसरे कोणीतरी असल्याचे सांगण्यात आले त्यामुळे आरोपीने फिर्यादीस दुस-या व्यक्तीच्या अकाऊंटचा चेक देवुन त्यावर बनावट सही करुन फिर्यादीची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. लोणारे ९९२३४४४९९८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २३४/१७,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | हर्षवर्धन भंडारी,वय-२८ वर्षे, रा.मुंढवा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०७/२०१७ ते दि.२८/०७/२०१७ रोजी संभाजी चौक, केशवनगर मुंढवा पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी चारचाकी गाडीची खरेदी करावयाची असल्याने त्यांनी वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी olx.com या ऑनलाईन खरेदी वेबसाईट वरुन चारचाकी गाडीची जाहिरात पाहुन संपर्क केला असता त्यांना वर नमुद मोबईल नंबर धारकांने सदरची गाडी एअरपोर्टच्या कार्गो सेक्शनमध्ये अडकेलेली असुन ती सोडवण्यासाठी ८६ हजार ५००/- रु. फिर्यादीस बँकखातेवर भरण्यास सांगितल्याने फिर्यादी यांनी नमुद रक्कम बँकखातेवर कॅश भरली व नंतर नमुद इसम यांना फिर्यादी यांनी फोन करुन मी पैसे भरले असुन मला गाडी दाखवा असे म्हणलाले असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे देवुन फिर्यदी यांचा फोन घेण्यास टाळाटाळ करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घाटगे ९९२३४२१३३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ४८९/१७,भादविक ४२०,४१९,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय २५ वर्षे,थेरगांव,पुणे |
| **आरोपी** | रॉबर्ट नेलसन,रा. यु.के. ( अटक नाही ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१६ ते आज पावेतो ऑनलाईन माध्यमाव्दारे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम यांची फेसबुकवरुन ओळख झालेली असुन, रॉबर्ट नेलसन याने फिर्यादीस लग्नाचे अमिष दाखवुन फिर्यादीस सोन्याचे दागिने व रोख रक्कम पाठवितो असे सांगुन, त्यानंतर फिर्यादी यांना दिल्ली एअरपोर्टवरुन फोन आला व सदरचे दागिने व रोख रक्कम सोडविण्यासाठी एकुण ९२ हजार रु.भरण्यास सांगितल्याने फिर्यादी यांनी ऑनलाईन रक्कम भरली त्यानंतर नमुद इसमाने फिर्यादीशी पुन्हा सपर्क न करता फिर्यादीची फसवणुक केली आहे. (यातील फिर्यादी यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) सुनिल पिंजन ८१०८१२८४२२ |

**८**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगडरोड पो स्टे २७२/१७,भादविक ४२०,१७०,४१९ |
| **फिर्यादी** | स्वप्नील सकट,वय २६ वर्षे,रा.खडकवासला,पुणे |
| **आरोपी** | दिलीप लक्ष्मण चौगुले,वय ३८ वर्षे,रा.सुजित कॉम्प्लेक्स सिंहगड रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | डिसेंबर २०१६ ते आज पावेतो सुजित कॉम्प्लेक्स सिंहगड रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना ॲन्टीकरप्शन इनवेस्टीगेशन ब्युरो गव्हरमेंट ऑफ इंडियाचा चीफ असल्याचे सांगुन,फिर्यादीचे भावास पिस्टल व लायसन्स देण्याचे अमिष दाखवुन,फिर्यादी यांचेकडुन २ लाख रु. रक्कम घेवुन तसेच फिर्यादी यांना ॲन्टीकरप्शन इनवेस्टीगेशन ब्युरो गव्हरमेंट ऑफ इंडियाचे ओळखपत्र देण्याचे अमिष दसखवुन १५ हजार रु. घेवुन असे एकुण २ लाख १५ हजार रु. घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.कोळपे ९८२३३८२२७० |

## दि.१८/०८/१७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | वारजे | भादविक ३०७ ३०७,२०१ | कुमार हिरामण चव्हाण | २७ |
| २ | मार्केटयार्ड | भादविक ३८४,३८५,३८७,३४ | सचिन वाल्हेकर | ३१ |
| ३ | चंदननगर | भादविक ३५३,३९२,३३२,५०४,४२७,३४ | प्रविण लक्ष्मण क्षीरसागर | २८ |
| ४ | चंदननगर | भादविक ३५३,३९२,३३२,५०४,४२७,३४ | अक्षण जालीदर इंदलकर | १९ |
| ५ | चंदननगर | भादविक ३५३,३९२,३३२,५०४,४२७,३४ | सचिन रंगनाथ भगत | ४७ |
| ६ | हिंजवडी | भादविक २७९,३३८,४२७, | सर्फराज मोतीन खान | २८ |
| ७ | चतुःश्रृंगी | भादविक ३८० | सारिका अनिल साळवे | ३६ |
| ८ | चिंचवड | भादविक ४१९,४२०,३४,आयटी ॲ.क. | इरहमेन स्मार्ट | ३३ |
| ९ | चिंचवड | भादविक ३९२,३४ | उमेश भारत ननवरे | २० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**